Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 09 December 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०९ डिसेंबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज राजस्थानमध्ये जयपूर इथं आयोजित रायझिंग राजस्थान ग्लोबल इन्व्हेस्टमेंट समिट अर्थात गुंतवणूक शिखर परिषदेचं उद्घाटन होत आहे. उद्घाटनानंतर ते या परिषदेला संबोधितही करणार आहेत. राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांच्यासह केंद्र आणि राज्य सरकारचे अनेक मंत्रीदेखील या कार्यक्रमाला उपस्थित आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत उद्योग आणि व्यापार क्षेत्राचे पाच हजारांपेक्षा जास्त प्रतिनिधी, राजकीय दूत आणि गुंतवणूकदार सहभागी होत आहेत. परिषदेत सहभागी होणाऱ्यांमध्ये विविध ३२ देशांचे प्रतिनिधी असून, त्यापैकी १७ देश या परिषदेचे भागीदार देश आहेत. या शिखर परिषदेला सुरुवात होण्याआधीच गुंतवणुकीशी संबंधित सुमारे ३० लाख कोटी रुपयांचे सामंजस्य करारही केले गेले आहेत.

****

दरम्यान, पंतप्रधान मोदी उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं होणाऱ्या महा कुंभ मेळ्याच्या पार्श्वभूमीवर येत्या १३ डिसेंबर रोजी प्रयागराजला भेट देणार आहेत. त्यादृष्टीनं तसंच कुंभ मेळ्याच्या तयारीच्या दृष्टीनं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी विविध कामांचा आढावा घेतला. कुंभमेळ्याच्या दृष्टीन सुमारे पाच हजार कोटी रुपये खर्चाची विविध विकास कामं करण्यात येत आहेत.

****

डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात सुमारे २४ हजार कोटी रुपये परदेशी गुंतवणूक देशात आली आहे. गेले दोन महिने परदेशी गुंतवणूकदारांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक काढून घेतली होती. मात्र त्याआधी सप्टेंबर २०२४ मध्ये परदेशी गुंतवणुकीचा त्याआधीच्या ९ महिन्यातला उच्चांक गाठला गेला होता. या वर्षभरात

आतापर्यंत परदेशी गुंतवणूकदारांनी एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक डिबेंचर स्वरुपात केली आहे.

****

राज्य विधानसभेच्या अध्यक्षांची निवड आज होणार आहे. या पदासाठी भाजपचे राहुल नार्वेकर यांचा एकमेव अर्ज आल्यानं त्यांची बिनविरोध निवड निश्चित असून, आज त्याची अधिकृत घोषणा होईल. आज विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीत राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांचं अभिभाषण होणार आहे.

****

सोलापूर जिल्ह्यातल्या मारकडवाडी इथं विधानसभा निवडणुकीत झालेली मतदान प्रक्रिया पारदर्शक आणि सुरक्षितच पार पडली असून, या मतदान प्रक्रियेवर अविश्वास दाखवणं, हे लोकशाहीला घातक ठरु शकतं, असं जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी म्हटलं आहे. या गावात मतपत्रिकेवर मतदान घेण्याच्या मागणीनंतर ते काल वार्ताहर परिषदेत बोलत होते. जे या मतदान प्रक्रियेवर अविश्वास दाखवतात त्यांनी पुराव्या निशी वेळेत तक्रार करणं अपेक्षित होतं, मात्र निवडणूक आयेगाने दिलेल्या वेळेत त्या ठिकाणाहून कोणाचीही तक्रार आलेली नाही. त्यामुळे आता फेरमतदानाची मागणी करणं, योग्य नसल्याचं जिल्हाधिकारी म्हणाले.

****

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त महापुरुषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून विविध कार्यक्रमांची सुरुवात काल करण्यात आली. महापालिकेच्या विविध वाहनांचं पथसंचलनही काल करण्यात आलं. वर्धापन दिनानिमित्त आजपासून तीन दिवस विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

ओमानमध्ये मस्कत इथं सुरु असलेल्या महिलांच्या कनिष्ठ गट आशिया करंडक हॉकी स्पर्धेत काल भारतीय संघानं बांग्लादेशवर १३ – एक असा दणदणीत विजय मिळवला. भारतातर्फे मुमताज खान हिनं चार तर कनिका सिवाच आणि दीपिका यांनी प्रत्येकी तीन गोल केले. गट साखळीतला भारताचा दुसरा सामना आज मलेशियासोबत होणार आहे.

****

श्रवणदोष असलेल्या खेळाडूंच्या आशिया पॅसिफिक क्रिडा स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे. मलेशियात क्वालालंपूर इथं पार पडलेल्या या स्पर्धेत

भारताला ५५ पदकं मिळाली. यामध्ये आठ सुवर्ण, १८ रौप्य आणि २९ कांस्य पदकांचा समावेश आहे. मैदानी स्पर्धांमध्ये भारतीय खेळाडूंनी पाच सुवर्ण पदकं पटकावली. केंद्रीय मंत्री मनसुख मांडवीय यांनी सर्व खेळाडूंचं अभिनंदन केलं असून, त्यांचं यश देशासाठी प्रेरणादायी असल्याचं म्हटलं आहे. या स्पर्धेत ६२ पदकं मिळवत इराणनं सर्वसाधारण विजेतेपद पटकावलं आहे.

****

फिडे जागतिक बुद्धीबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या डी गुकेश यानं सहा – पाच अशी आघाडी मिळवली आहे. सिंगापूरमध्ये सुरु असलेल्या या स्पर्धेच्या ११व्या फेरीत काल गुकेशनं गतविजेत्या चीन च्या डिंग लिरेन वर मात केली. या विजयामुळे गुकेशनं सामने बरोबरीत राहण्याची मालिका खंडीत केली असून, अद्याप तीन फेर्या बाकी आहेत.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पैठण इथल्या जायकवाडी धरणाच्या डाव्या कालव्यातून अठराशे घनफूट प्रतिसेकंद वेगाने पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. धरणात सध्या ९६ पूर्णांक २० टक्के इतका पाणीसाठा आहे.

****

नाशिक जिल्ह्यात तापमानात लक्षणीय घट झाली आहे. निफाडमध्ये आज या हंगामातलं सर्वात कमी सहा पूर्णांक दोन अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. नाशिक शहरातही आज सकाळी किमान तापमान नऊ पूर्णांक चार अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं. नाशिकमध्ये दोन दिवसात पारा १२ अंशाने घसरला आहे.

****

दरम्यान, पुढच्या दोन दिवसात राज्यात काही भागात पावसाच्या हलक्या सरींची शक्यता असली तरी, उर्वरित भागात हवामान कोरडे होण्यास सुरुवात झाल्यानं, गारठा वाढणार असल्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****